INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

निजाम मीर उस्मान अलिखानचे धार्मिक धोरण

(Religious Policy of Nizam Mir Osman Ali Khan)

डॉ. के. डी. सावंत
इतिहास विभाग प्रमुख,
महिला कला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड

DOI No. 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/03.2023-49667651/IRJHIS2303009

प्रस्तावना : -

मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाच्या काळात चिन कुलीजखान म्हणजेच निजाम उल-मुल्क आसफजहा पहिला हा सुभेदार म्हणून दक्षिणेत आला. इ.स. 1724 मध्ये साखरखेडच्या लढाईत मुबारिजखान या मोगल सेनापतीचा पराभव करून त्याने स्वत:च्या घराण्याची भागानगर येथे स्थापना केली.[1] तो अत्यंत धूर्त व व्यवहारवादी असल्यामुळे त्याने परधर्मसहिष्णुतेचे धोरण अंगिकारले व सर्व धर्मियांचा पाठींबा मिळवून आपली सत्ता दक्षिणेत बळकट केली. 21 मे 1748 रोजी निजाम कमरूद्दीनखान असफजहाचे निधन झाले. त्याच्या मृत्युनंतर साधारण चौदा वर्ष सत्तास्पर्धा चालू होती. त्यात नवाब नासिरजंग (इ.स. 1748-1750), नवाब मुजफ्फरजंग (निजाम उलमुल्कचा नातू) (इ.स. 1750-1751), नवाब गाजिउद्दीनखान बहादूर फत्तेहजंग- (ऑगस्ट 1752 ते इ.स. ऑक्टोबर 1752) नवाब सलाबतजंग (इ.स. 1751 इ.स. 1762) त्यानंतर इ.स. 1762 मध्ये दुसरा निजाम म्हणून निजामअली हा सत्ताधीश झाला.[2] इ.स. 1803 पर्यंत सत्तेवर होता. त्यानंतर त्याचा पुत्र सिकंदरजहा (इ.स. 1803 ते इ.स. 1829) पर्यंत निजाम म्हणून सत्तेवर विराजमान होता. या काळात राज्यकारभाराची सर्व सूत्रे चंदूलाल या हिंदू मंत्र्याकडेच असल्यामुळे परधर्म सहिष्णुतेचे धोरणाचा पुरस्कार केला गेला. सिकंदरजहा नंतर नासिर- उद्- दौला हा निजाम झाला. तो (1829 ते 1857) पर्यंत या पदावर कार्यरत होता. त्याच्यानंतर अफजल - उद् - दौला (इ.स. 1857 ते 1869) पर्यंत निजाम म्हणून सत्तेवर होता. अफजल - उद् - दौलानंतर मीर महबूब अलिखान (इ.स. 1869 ते 1911) पर्यंत निजाम म्हणून हैदराबादच्या सत्ताधिश होता. मीर महबूब अलीखान याच्या काळात सालारजंग (इ.स. 1853 ते 1883) या पंतप्रधानाने विविध सुधारणा हाती घेऊन लोककल्याणाचे प्रयत्न सुरू केले. प्रशासनाचे आधुनिकीकरण करण्यासाठी उत्तर हिंदूस्थानातील काही विद्वान व तज्ज्ञ लोक हैदराबाद राज्यात आणले. यामध्ये मोठ्या प्रमाणात मुस्लीम होते. सहाव्या निजामाने (मीर महबूब अलिखानने) धार्मिक बाबतीत उदार धोरणाचा अवलंब केला जाईल अशी घोषणा केली. त्याच्या धार्मिक धोरणाचे सुत्र "ला इकराह फिद दिन लाकुम दिनुकुम वा. लियद्दीन"[3] हे होते.

धार्मिक श्रध्देच्या बाबतीत कोणतीही सक्ती केली जाणार नाही. तूमच्यासाठी तुमच्या धर्म व माझ्यासाठी माझा धर्म हे आदर्श व उदार धोरण राबविले जाणार होते, पण अवघ्या पंधरा वर्षानंतर जाहिर केलेल्या धोरणापेक्षा भिन्न धोरणाची सुरूवात

करण्यात आली.

सहाव्या निजामाच्या काळात लोक कल्याणाची अनेक कामे झाली असली तरी हिंदूंना त्यांच्या परंपरागत दसरा या सणावर अनेक निर्बंध लादले व दसरा सणाचा आनंद घेऊ दिला नाही. कायदा व शांतता पालन करण्याची सर्व जबाबदारी केवळ हिंदूवरच लादण्यात आली होती. तर इस्लाम धर्म व मुस्लिम समाज यांना विशेष सवलती देण्यास सुरुवात केल्यामुळे सामाजिक असंतोषाची बीजे पेरली गेली व त्याचा परिपाक सातव्या निजामाच्या काळात झाल्याचे दिसते. सातव्या निजामाच्या धार्मिक धोरणाचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

निजाम मीर उस्मान अली खान चे धार्मिक धोरण : -

29 ऑगस्ट 1911 या दिवशी म्हणजेच वयाच्या 29 व्या वर्षी मीर उस्मान अली खान बहादुर सातवा निजाम सत्तेवर आला. तो अत्यंत धन लोभी व चिक्कू असून साध्या राहणीचा पुरस्कर्ता होता. हैदराबादच्या आधुनिकीकरणासाठी त्याने अविश्रांत श्रम केले यात संशय नाही. इतर संस्थानिकापेक्षा आपले स्वतंत्र अस्तित्व आहे असे मानणारा व हैदराबादची व्यवस्था एखाद्या राष्ट्राप्रमाणे ठेवणारा तो राजा होता. त्याने आपल्या राज्यात स्वतंत्र वाहतूक व्यवस्था, रेल्वे व पोस्ट चलन व्यवस्था, बँका, लष्कर व सिविल सर्विस या गोष्टीची सुबद्ध सोय केली. सत्तेवर आल्यावर त्याने स्वतःचे धार्मिक धोरण जाहीर केले. तो म्हणाला, "as a ruler I am the follower of another religion as well which may be characterised as 'love towards all' because under me live people of different faith's and different communities and protection of their houses of worship has been for a long time a part of the constitution of my state".[4] सर्वांविषयी प्रेम व सर्वांच्या पूजा स्थानांचा आदर ठेवणे हे सूत्र धार्मिक बाबतीत अवलंबिले जाईल कारण या राज्यात विविध धर्मांचे लोक राहतात व या राज्याची ती वंशपरंपरा आहे म्हणून सर्वांना समानतेने वागविले जाईल. असे आश्वासन निजाम मीर उस्मान आली खानने दिले होते.

निजाम सरकारच्या धार्मिक धोरणात धर्मांतराची मोहीम कधीच नव्हती. तसेच निजाम सरकारने हिंदूचे एकही देवस्थान पाडले नाही. मशिदीप्रमाणे हिंदू मंदिरांनाही खिदमतशाह (सेवेबद्दल अनुदान) व मददमाश (अर्थसाह्य) दिले. इतकेच नव्हे तर हैदराबाद संस्थांना बाहेरील हिंदू देवस्थानासाठी देखील आर्थिक सहाय्य दिले. याशिवाय हिंदूंच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत म्हणून मुस्लिमांना गोहत्तेपासून परावृत्त करण्याचाही प्रयत्न केला.

निजाम मीर उस्मान अली खान यांचे हिंदू समाजावर धार्मिक निर्बंध :-

इ.स. 1916 नंतर निजाम सातव्याच्या धार्मिक धोरणामध्ये अमुलाग्र बदल झाला व त्याने हिंदूवर अनेक निर्बंध लादले. हैदराबाद राज्यात सरकारच्या धार्मिक धोरणाबद्दल जी फर्माने निघत त्याला (अहकामे उमूरे मजहबी) धार्मिक खात्याचे हुकूम म्हणत असत. इ.स. 1917 मध्ये दसरा व मोहरम हे सण एकाच वेळी आले. तेव्हा निजाम सरकारने (13 अजूर 1326 फसली) इ.स. 1917 मध्ये खालील आदेश जाहीर केले. त्यापैकी काही आदेश पूर्वी सहाव्या निजामाने जाहीर केलेले होतेच. त्यात निजाम मीर उस्मान अली खान ने आणखी आदेश काढून भर घातली, त्यामुळे ते हिंदू समाजाला अधिक जाचक ठरले.

1) अ) हैदराबाद शहरातील व जिल्ह्यातील सर्व हिंदूंनी स्वतःची पूजा कोणतेही वाद्य न वापरता करावी.

ब) भक्तामा (आंध्रातील देवता) या देवतेची घराबाहेर मिरवणूक काढू नये हिंदूंनी घरगुती मंदिरातही वाद्य वाजवू नये.

क) हिंदूंना सिमोल्लंघणासाठी जावयाचे असेल तर त्यांनी अत्यंत शांततेने सुतकी चेहऱ्याने जावे. दसऱ्याच्या दिवशी ध्वज लावता येणार नाही. तो मोहरमच्या पंधराव्या तारखेस लावावा.

2) कोणताही धार्मिक उत्सव धर्मखात्याच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

3) मशिदीसमोर अथवा मशिदीपासून तीनशे पावलांच्या आत वाद्य वाजवता येणार नाही. या आदेशात केवळ नमाजाच्या वेळी वाद्य वाजवू नये असे न म्हणता वाद्य वाजवू नये असे म्हटलेले होते.

4) एखाद्या सार्वजनिक ठिकाणी नवीन धार्मिक उत्सव सुरू केला असेल अथवा जुन्या उत्सव प्रथेचे पुनरुज्जीवन केल्यामुळे सामाजिक शांततेचा भंग होण्याची शक्यता वाटल्यास सरकार त्यावर बंदी घालेल.

5) हैदराबाद शहर अथवा इतर कोणत्याही जिल्ह्यात मुसलमानांची संख्या जर खूप जास्त असेल तर येथील मंदिराचा विस्तार व डागडुजी करता येणार नाही. खाजगी व्यक्ती देखील स्वखर्चाने अशा मंदिराची डागडुजी करू शकणार नाही.

6) हैदराबाद राज्य हे इस्लामी राज्य असल्यामुळे सरकार इस्लाम धर्म व मुसलमान यांच्याबद्दल सहानुभूती बाळगेल.

7) मिरवणूक काढावयाची असल्यास जिल्ह्यातील तहसीलदाराला व हैदराबाद शहरात कमिशनरला दहा दिवसांची पूर्व सूचना देणे आवश्यक आहे. याशिवाय इ.स. 1932 मध्ये एक आदेश काढण्यात आला. त्याप्रमाणे धार्मिक प्रवचनांनाही सरकारच्या धर्म खात्याची पूर्वपरवानगी सक्तीची करण्यात आली.[5]

निजामाने ही धार्मिक बंधने का लादली असावी याचा विचार करणे आवश्यक आहे. इ.स. 1911 मध्ये तो सत्तेवर आला. आपली सत्ता अधिक बळकट करण्यासाठी स्वतःच्या जातीचा अव्यहात पाठिंबा मिळत राहावा ही कल्पना त्यास सुचली असेल. मुस्लिम समाजाचा असा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांना खुश करणे आवश्यक होते. त्यामुळे जेव्हा इ.स. 1917 मध्ये दसरा व मोहरम हे सण एकाच वेळी आले तेव्हा हिंदू समाजापेक्षा मुस्लिमांना विशेष सवलती दिल्यामुळे त्यांचा पूर्ण पाठिंबा मिळणे सहज शक्य झाले. शिवाय हिंदू हे शासित आहेत व मुसलमान शासक आहेत ही भावना स्पष्ट झाली. म्हणजेच हैदराबाद संस्थानातील मुसलमानांचा राज सत्तेस बिनशर्त पाठिंबा मिळण्याची सोय झाली.

दुसरे असे की लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची प्रथा महाराष्ट्रात सुरू केलेली होती. ज्याचे लोणही हैदराबादेत येऊ लागले होते. लोकमान्य यांच्या गणेशोत्सव प्रथेत सामाजिक संघटन करून इंग्रजांच्या सत्तेस आव्हान देण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे हे ध्येय होते. म्हणजेच राजकीय बाजारपेठेचे गणेशोत्सव हे माध्यम होते. तो प्रवाह हैदराबाद राज्यात आला तर स्वतःच्या सत्तेला धोका आहे असे निजामास वाटले असावे म्हणूनच त्याने धार्मिक उत्सवावर विविध निर्बंध लादले. तसेच हैदराबाद संस्थानात आर्य समाजाने आपले पाय रोवले होते. मराठवाड्यातील धारूर या ठिकाणी इ.स. 1811 मध्ये आर्य समाजाची पहिली शाखा स्थापन झाली होती. आर्य समाजाने हिंदू मधील मानसिक दुर्बल्य नष्ट करून हिंदू समाज अधिक संघटित करण्याकडे लक्ष दिले. आर्य समाजाच्या कार्यामुळे हिंदू समाज डोईजड होऊन स्वतःच्या सत्तेस आव्हान देईल ही भीती देखील निजामास वाटले असावी म्हणून त्याने धार्मिक निर्बंध लादले असावेत. पण याहीपेक्षा अधिक महत्त्वाची कारण म्हणजे स्वतःच्या सत्तेचे संवर्धन आणि निजामाचा धार्मिक दृष्टिकोन होता.

निजाम सरकारने जाहीर केलेल्या विविध निर्बंधाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास हे स्पष्ट दिसून आले की सरकारने धर्माच्या बाबतीत भेदभावाचा पुरस्कार केलेला होता. सहाव्या निजामाच्या कारकिर्दीत प्रचलित असलेल्या नियमापेक्षाही अधिक कडक नियम जाहीर करून आपल्या संस्थानाचे इस्लामीकरण करण्याचा हा डाव होता. मोहरम व दसरा हे सण एकाच वेळी आल्यानंतर दसरा सण साजरा करताना हिंदूंनी त्याचे धार्मिक विधी व पूजा अर्चा स्थगित ठेवावी ही अपेक्षा होती. याचाच अर्थ हा की हिंदूच्या धर्मभावांना मुस्लिम बांधवांच्या धर्मभावनेपेक्षा कनिष्ठ आहेत असे लेखले गेले होते. सार्वजनिक मिरवणुकीवर निर्बंध लादून हिंदूंना त्यांच्या मूलभूत हक्कापासून वंचित ठेवण्यात आले होते. याशिवाय शासकीय अधिकाऱ्यांना एका जमाती पेक्षा दुसऱ्या जमातीस

अधिक प्राधान्य देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले होते. त्यामुळे हिंदूचे कोणतेही धार्मिक उत्सव अथवा कार्यक्रम कोणते तरी निमित्त करून बंद पाडण्याचा हक्क अधिकाऱ्यांना प्राप्त झाला होता. तसेच हैदराबाद राज्य हे 'इस्लामी राज्य' आहे ही घोषणाही विसाव्या शतकात कालबाह्य होती.

निष्कर्ष :-

निजाम मीर उस्मान अलीखान याने इस्लाम धर्मास प्राधान्य देऊन हिंदू वर अनेक निर्बंध लादल्यामुळे संस्थानात दंगेधोपे सुरू झाले. तेथील हिंदू समाज संतप्त झाला व स्वतःच्या धार्मिक हक्कासाठी लढण्यास सुसज्ज झाला. त्यातच आर्य समाजाची साथ मिळाली. त्यामुळे जहाल व मवाळ कार्यकर्ते एकत्र आले. त्यांनी निजाम व त्याचे इस्लामी धोरण याविरुद्ध आंदोलन सुरू केले. या आंदोलनात हैदराबाद स्टेट काँग्रेसचे आंदोलन केवळ राजकीय स्वरूपाचे होते. स्टेट काँग्रेसच्या नेत्यांनी त्यास धार्मिक कलंक लागू दिला नाही. हैदराबाद संस्थानात रजाकारांविरुद्ध हिंदू समाज यांच्या चकमकी होत राहिल्या. त्यात प्रचंड मानाने वित्तहानी झाली.

संदर्भ सूची : -

1) इम्पीरियल गॅझेटर ऑफ इंडिया, पोव्हिशिअल सिरिज, हैदराबाद स्टेट सुप्रिटेंड ऑफ गव्हर्नमेंट प्रिंटिंग, कलकत्ता, 1909, पृष्ठ - 15.
2) डॉ. नय्यीम एम.ए., द स्पेलेंडर ऑफ हैदराबाद, (इंग्रजी), द लॉस्ट फेज ऑफ ऑन ओरिएन्टल कल्चर, हैदराबाद, पब्लिशर्स, हैदराबाद, 2002, पृष्ठ 96.
3) मुर्ताझा कादरी, ट्रान्सलेशन ऑफ रिव्ह ऑन द ॲड्रेस प्रेझेंटेंड, (इंग्रजी), एच.एच. ऑसिफजहा नवाब मिस्टर सर महबूब अलिखान बहादूर, पृष्ठ 4.
4) Prominent Houses of worship, Shines and Religious Buildings in Hyderabad, By Information Bureau, Pg. 8.
5) Pathak L.B., A Pamphlet, Religious Disabilities of Hindus of Hyderabad State, Pg.- 9, 13.